**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ५५३/२०११</u>**

१. श्री दिपक महेन्द्र पांडे - **तक्रारकर्ता**
चुडी मोहल्ला वार्ड नं.१०
पुलगाव ता. देवळी जि. वर्धा.

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **गैरतक्रारकर्ता**
तहसिल कार्यालय आर्वी
आर्वी जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक ०४/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारकदार यांनी दि. ०३/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०८/२०११ रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार आर्वी, श्री जी. एन. करलुके हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी आयोगाकडील अपील क्र. ८९४/२०१० मधील दि.१९/०७/२०१० च्या आदेशाप्रमाणे त्यांना नायब तहलिसदार यांचेकडून अभिलेखागाराचे निरिक्षण मिळालेली नाही म्हणून त्यांनी तक्रार दाखल केली आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार आर्वी श्री अजय चरडे हजर तसेच तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार आर्वी श्री करलुके हे हजर आहेत.

४. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री करलुके यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ८९४/२०१० मधील दि. १९/०७/२०१० च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना तात्कालीन तहसिलदार यांनी दि. १७/०९/२०१० च्या पत्राने अभिलेखागाराचे निरिक्षण करण्याकरिता दि.०५/१०/२०१० रोजी तहसिल कार्यालयात बोलविले होते. परंतू तक्रारदार हे तहसिलदार यांचे कार्यालयात निरिक्षणासाठी उपस्थित झाले नाही. त्यावर तक्रारदार यांनी असे सांगितले की, सदरचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही म्हणून ते अभिलेख्यांचे निरिक्षण करण्यासाठी तहसिल कार्यालयात गेले नाही.

५. तक्रारदार आणि तहसिलदार आर्वी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दोघांच्या संमतीने असे ठरविण्यात आले की, तक्रारदार यांनी दि.०९/०८/२०११ रोजी कार्यालयीन वेळेत तहसिलदार आर्वी यांचे कार्यालयाकडे उपस्थित राहून नायब तहसिलदार यांचेसोबत अभिलेखागारातील अभिलेख्यांचे निरिक्षण करुन घेणे योग्य होईल म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांनी दि.०९/०८/२०११ रोजी तहसिलदार आर्वी यांचे कार्यालयात हजर राहून नायब तहसिलदार यांचेसोबत अभिलेखागाराचे निरिक्षण करुन घ्यावे.आणि निरिक्षणाअंती माहिती उपलब्ध झाल्यास जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ६५६/२०११</u>**

१. श्री भाऊ सचिदानंद नथ्थुजी लोखंडे - **तक्रारकर्ता**
संघर्ष ५८ मोहगांव (झिल्पी),
तहसिल हिंगणा, जि. नागपूर.

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **गैरतक्रारकर्ता**
ग्राम पंचायत मोहगांव (झिलपी)
ता. हिंगणा, जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक १०/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारकदार यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०८/२०११ रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मोहगाव (झिलपी) ता. हिंगणा श्री प्रकाश ढाले हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचे आयोगाकडील अपील क्र.१३०५/२०१० मधील दि.२३/०९/२०१० च्या निर्णयाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी यापूर्वी आयोगाकडे तक्रार क्र.३६८/२०१० दाखल केली होती. सदर तक्रारीची सुनावणी दि.२३/०२/२०११ रोजी होवून आयोगाने आदेश निर्गमित केले होते. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत मोहगाव झिल्पी ता. हिंगणा यांचेकडे तक्रारदार यांनी उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेली माहिती जनमाहिती

अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे नमुद केले होते. त्याप्रमाणे तक्रारदार हे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहिले मात्र त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी पुन्हा आयोगाकडे दि.०८/०४/२०११ रोजी तक्रार दाखल केल्याचे सांगितले. आणि जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मोहगाव श्री प्रकाश ढाले हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार यांनी माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ही व्यापक प्रमाणात असल्यामुळे आतापर्यंत त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र सदर माहिती तयार करुन लवकरच तक्रारदारास उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडील अपील क्र.१३०५/२०१० मधील आणि प्रथम तक्रार क्र. ३६८/२०१० मधील दि.२३/०२/२०११ च्या निर्णयाप्रमाणे अर्जदारास आवश्यक ती माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत मोहगाव झिलपी ता. हिंगणा श्री प्रकाश ढाले यांनी तक्रारदारास आयोगाकडील तक्रार क्र. ३६८/२०१० मधील निर्णय दि.२३/०२/२०११ च्या आदेशाप्रमाणे अदयापपर्यंत कोणतीही माहिती

उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच त्यांनी त्याबाबत केलेला खुलासा मान्य करता येत नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवा शर्तीस अनुसरुन शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही संवर्ग विकास अधिकारी हिंगणा पंचायत समिती यांनी करावयाची आहे. त्यासाठी सदर निर्णयाची एक प्रत संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांना देण्यात येत आहे.

४. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**<u>तक्रार क्र. ६११/२०११</u>**

१. श्री ईश्वर तुळशीरामजी अमृतकर - **तक्रारकर्ता**
वार्ड.नं. ३ भगतसिंह चौक,
राधाकृष्ण मंदिराजवळ, नागभिड जि. चंद्रपूर.

२. जनमाहिती अधिकारी - **गैरतक्रारकर्ता**
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागभिड
जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक ११/०८/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारकदार यांनी दि. ३१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७/०७/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११/०८/२०११ रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती नागभिड, जि. चंद्रपूर सौ. लता रमेश शेडमाके हजर होते.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील त्यांचे अपील क्र.१२७९/२०१० मधील दि.२०/०९/२०१० च्या आदेशाप्रमाणे १० दिवसात जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तक्रारदार यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती नागभीड जि. चंद्रपूर सौ लता शेडमाके यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचे आयोगाकडील अपील क्र. १२७९/२०१० मधील दि.२०/०९/२०१० च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना उपलब्ध करुन द्यावयाची माहिती ही ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत नागभिड यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांना दि.१२/०५/२०११ च्या पत्रान्वये तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. त्यानंतर पुन्हा ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत नागभिड यांना दि.१०/०८/२०१० च्या पत्रान्वये देखील कळविले आहे. तथापी ग्राम विकास अधिकारी नागभिड यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे किंवा तक्रारदार यांचेकडे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांनी सांगितले.

४. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी पंचायत समिती यांनी ग्राम विकास अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी पंचायत समिती नागभिड यांनी अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत नागभिड यांचेकडून प्राप्त करुन घेऊन १५ दिवसात तक्रारदार यांना उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी पंचायत समिती नागभिड यांचेकडे ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत नागभिड यांनी १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर त्यांचेवर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत नागभिड जिल्हा चंद्रपूर यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

४. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**